अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगांव-425001**
NORTH MAHARASHTRA UNIVERSITY, JALGAON-425001
'A'GRADE
( NAAC RE-ACCREDITED)
3 rd Cycle

शैक्षणिक पात्रता करतांना येणाऱ्या
अडचणींच्या कार्यवाही संदर्भात
पुर्तता करणेबाबत

**वाचा :-** १) विद्यापीठ परिपत्रक क्र. १६६/२०१७ दिनांक १६/०६/२०१७
२) प्रवेश पात्रता विभागाचे पत्र क्र.उमवि/६/प्रवेश पात्रता/११८/२०१६ दिनांक ०१/०७/२०१६
३) प्रवेश पात्रता विभागाचे पत्र क्र.उमवि/६/पात्रता/३३७/२०१३ दिनांक ०३/०७/२०१३
४) विद्यापीठ परिपत्रक क्र. १५०/२००८ दिनांक २६/०६/२००८
५) विद्यापीठ परिपत्रक क्र. १५७/२००४ दिनांक ०४/०८/२००४

महोदय / महोदया,

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ साठी संलग्नीत महाविद्यालयात प्रवेश प्रक्रिया सुरु झालेली आहे व परिपत्रक क्र. १६६/२०१७ अन्वये विविध शैक्षणिक प्रवेश पात्रतेच्या नियमावली निर्गमित करण्यात आलेले आहे. परिपत्रक क्र. १६६/ २०१७ च्या अधिन राहून प्रवेश प्रक्रियेतील अनुषंगाने सुसूत्रता येण्यासाठी तसेच शैक्षणिक पात्रतेत त्रुटी राहू नये, याकरीता खालील सूचनांचे काटेकोर पालन करण्यात यावे.

१) महाविद्यालयीन प्रवेश प्रक्रिया राबवितांना प्रत्येक महाविद्यालयात स्वतंत्र्य प्रवेश समिती नसल्यास स्वतंत्र प्रवेश समिती स्थापन करण्यात यावी व प्रवेश समितीत किमान दोन मान्यवर अनुभवी प्राध्यापक असावेत व त्या समितीचे अध्यक्ष महाविद्यालयाने नेमावे, प्रवेश समितीने विद्यापीठ परिपत्रकाप्रमाणे प्रवेश द्यावयाचे आहेत. व महाविद्यालयातील प्रत्येक प्रवेश हा समितीमार्फतच होणे आवश्यक आहे. यासंदर्भातील माहिती प्रवेश समिती सदस्यांचे नावे मोबाईल क्र. / ई-मेलसह लेखी स्वरुपात दि. १४/ ०७/२०१७ पर्यंत उपकुलसचिव प्रवेश पात्रता विभागाकडे दोन प्रतीमध्ये कळवावी. प्रवेश समितीची यादी वेळेत विद्यापीठास प्राप्त न झाल्यास सदर महाविद्यालयाचे पात्रता अर्ज स्विकारण्यात येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

२) प्रवेश समितीने प्रवेश देतांना विद्यार्थ्यांनी घेतलेले विषयांचे नाव व विषय कोड कारकाइने तपासून घेणे आवश्यक आहे. तसेच सदर विषय आपल्या महाविद्यालयात शिकविला जातो किंवा नाही, सदर विषयास विद्यापीठाची मान्यता असल्याबाबतची खातरजमा करुनच प्रवेश द्यावा. कोणत्याही परिस्थितीत अपुर्ण कागदपत्रांवर किंवा अनुत्तीर्ण विद्यार्थ्याला प्रवेश देण्यात येवू नये. असे प्रवेश झाल्यास त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी मा.प्राचार्य यांची राहील.

३) विद्यापीठाच्या असे निदर्शनास आले आहे की, शैक्षणिक पात्रता संदर्भातील सर्व प्रकारचे शुल्क भरण्यासाठी विद्यापीठ शुल्काचा शेअर चार्ट व माईंनडेड मध्ये ऑनलाईन सुविधा उपलब्ध असतांना काही प्रकारचे शुल्क रोखीने भरण्यासाठी महाविद्यालयांचे प्रतिनिधी आग्रह धरीत असतात. तरी सर्व प्रकारचे शुल्क विद्यापीठ शुल्काचा शेअर चार्टमध्ये ऑनलाईनेच नमूद करण्यात यावे. महाविद्यालय बदल,पुर्नप्रवेश,विषय बदल,विद्याशाखा बदल, पुर्नपरीक्षार्थी, विद्यापीठ बदल इ. शुल्कांच्या बाबतीत संदर्भ क्र. ४ च्या परिपत्रकानुसार संबंधीत विद्यार्थ्यांकडून शुल्काची आकारणी करुन विद्यापीठ शुल्काचा शेअर चार्टमध्ये नमूद करावे. वर नमूद करण्यात आलेले कोणतेही शुल्क रोखीने स्विकारले जाणार नाही. कृपया याची नोंद घ्यावी.

४) तसेच काही महाविद्यालयांचे प्रतिनिधी ऑनलाईन पात्रता अर्ज भरतांना त्यात विद्यार्थ्यांची मागील शैक्षणिक अर्हता, अभ्यासक्रमाचे नाव, बोर्ड / विद्यापीठाचे नाव इत्यादी माहिती अचूक नमूद करीत नाहीत. त्यामुळे तांत्रिक अडचण निर्माण होत असतात. तेव्हा सर्व महाविद्यालयांनी विद्यापीठ अनुदान आयोग,नवी दिल्ली यांच्या www.ugc.ac.in ह्या संकेतस्थळावर विद्यापीठांची मान्यता प्राप्त यादी / माहिती उपलब्ध असून, महाविद्यालयांनी सदरची माहिती प्राप्त करुन घ्यावी. मान्यता प्राप्त उच्च माध्यमिक शालांत (१२वी)/ विद्यापीठ/ संस्थामधुन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनाच शैक्षणिक पात्रतेनुसार प्रवेश देण्यात यावा. बोगस विद्यापीठांची (Fake universities) पदवी / पदवीका घेतलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्यास त्याबाबत संबंधीत महाविद्यालय जबाबदार राहील.

५) प्रवेश देते वेळी विद्यापीठाच्या संलग्नता विभागाने मंजूर केलेल्या प्रवेश क्षमतेच्या अधिन राहून गुणवत्तेनुसारच प्रवेश देण्यात यावा. प्रवेश पुर्ण झाल्यावर मा.प्राचार्यांनी प्रमाणित केलेली गुणवत्ता यादी महाविद्यालयाच्या नोटीस बोर्डवर तसेच संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी. प्रवेशाबाबत विद्यार्थी / पालक यांचे काही आक्षेप असल्यास त्यांचे आपल्यास्तरावर निराकरण करावे. गुणपडताळणी किंवा पुर्नमुल्यांकनानंतर प्रवेशास पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याबाबत संदर्भ क्र.३ नुसार कार्यवाही करण्यात यावी. कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थ्यांना प्रवेशाच्या कामासाठी पत्र देवून विद्यापीठाकडे पाठविण्यात येवू नये.

६) महाविद्यालयांमध्ये प्रवेशाच्या वेळेस विद्यार्थ्यांचे नाव इयत्ता १२ वी च्या गुणपत्रकावर नमूद केलेल्या नावाप्रमाणेच ऑनलाईन पात्रता अर्जामध्ये भरावे. विद्यार्थ्यांच्या नावात दुरुस्ती असल्यास त्याच शैक्षणिक वर्षात विद्यापीठाने विहित केलेल्या नियमावलीनुसार बदल करुन घेण्याची कार्यवाही करावी. परस्पर विद्यार्थ्यांच्या नावात किंवा अडनावात बदल करु नये.

७) महाविद्यालयात प्रवेशित विद्यार्थ्यांच्या पात्रता अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे (Besic Document) जोडणे आवश्यक आहे. पात्रता अर्ज विद्यापीठात सादर करतेवळी स्वतंत्र पट्टी फाईलमध्ये सोबतच्या परिशिष्ट 'अ' सोबत :- १) प्रवेशित विद्यर्थ्याच्या नावांची यादी २) मा.प्राचार्यांचे मान्यता पत्राची छायांकित प्रत ३) संलग्नता विभागाचे विद्यार्थी संख्या मंजूरी पत्राची प्रत ४) मा.प्राचार्यांचे प्रमाणपत्र ५) विद्यार्थ्याचे हमीपत्र (अनुसूचित जमातीच्या वैधतेबाबत)६) शुल्क भरल्याचे माईंनडेड ७) विद्यापीठ शुल्काचा शेअर चार्ट ८) प्रवेश रद्द केलेले असल्यास प्रवेश रद्दचे पत्र ९) परिशिष्ठ-'ब' मध्ये विद्यार्थ्यांनी जोडलेल्या कागदपत्राच्या पडताळणीसाठी एकत्रित तक्ता.(लिगल पेपरवर) (इंग्रजी अक्षर वर्णाप्रमाणे) १०) महाविद्यालयाने नियुक्त केलेल्या प्रवेश नियंत्रण समिती सदस्यांची नावे व मोबाईल नंबर इ.माहिती परिशिष्ठ 'अ' व 'ब' मधील तक्त्याप्रमाणेच प्रवेश पात्रता विभागात सादर करावी. **परिशिष्ठ 'ब' हे पदवी, पदव्युत्तर आणि सर्व व्यवसायिक अभ्यासक्रमांसाठी बंधनकारक आहे. परिशिष्ठ 'ब' नसल्यास पात्रता अर्ज स्विकारले जाणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी.**

८) व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या ( जसे बी.एड., एम.एड., एम.सी.ए., एम.बी.ए., बी.ई. इत्यादी अभ्यासक्रम, ज्यांचे प्रवेश शासनाच्या केंद्रीभुत पध्दतीने होतात) अशा विद्यार्थ्यांच्या पात्रता अर्जासोबत स्कोअर कार्ड / गुण तालिका ( Scorcard), ॲडमिशन लेटर (Alloutment/Admmission Slip), टी.सी., १२ वी / पदवी / पदव्युत्तर गुणपत्रके (य.च.म.मुक्त विद्यापीठाचे प्रथम/द्वितीय/तृतीय वर्षाचे व एकत्रित गुणपत्रके व य.च.म.मुक्त विद्यापीठाची पदवी घेण्या आधीचे एल.सी./टी.सी.), मुळ स्थलांतर, विद्यार्थ्यांचे हमीपत्र , जात प्रमाणपत्र , जात वैधता प्रमाणपत्र, (शा.नि.दि.३०/०८/२००६ मधील तरतूदीनुसार व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी अनुसूचीत जमातीच्या राखीव जागेवर प्रवेश देतांना ), नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र, अधिवास दाखला (Domicile), राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र, शिक्षणामध्ये खंड असल्यास मुळ गॅप सर्टिफिकेट व आवश्यकते नुसार मुळ मायग्रेश सर्टिफिकेट इत्यादी कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.

९) विद्यापीठात पात्रता अर्ज सादर केल्यानंतर ऑगस्ट महन्यिानंतर जे विद्यार्थी प्रवेश रद्द करतील अश्या विद्यार्थ्यांच्या पी.आर.एन.सह नावांची यादी दोन प्रतीत विद्यापीठ कार्यालयास ( एक प्रत ई- सुविधा कक्ष व एक प्रत पात्रता विभागात ) मा.प्राचार्य यांच्या स्वाक्षरीने सादर करण्यात यावी. प्रवेश रद्द झालेल्या विद्यार्थ्यांचा कोणत्याही परिस्थितीत महाविद्यालयाकडून अर्ज परीक्षा अर्ज स्विकारले जाणार नाहीत, याची दक्षता घ्यावी.

१०) ज्या महाविद्यालयात प्राचार्यांचे पद रिक्त असेल त्या महाविद्यालयातील प्रभारी प्राचार्यांच्या स्वाक्षरीने पात्रता अर्ज व पत्रव्यवहार सादर करतांना विद्यापीठातील व्याख्याता मान्यता विभागाची मान्यता घ्यावी किंवा प्रभारी प्राचार्य म्हणूण नियुक्तीची पत्र जोडावे, त्या शिवाय पात्रता अर्ज व इतर पत्रव्यवहार स्विकारले जाणार नाही.

११) तसेच प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांची विद्याशाखा बदल, महाविद्यालय बदल,पुर्नप्रवेश व विद्यापीठ बदल (इतर विद्यापीठातून प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे पात्रता अर्ज व इतर आवश्यक त्या दाखल्यासह स्थलांतर प्रमाणपत्र प्रवेश पात्रता विभागात जमा करण्यात यावे) याबाबत योग्य ती कार्यवाही महाविद्यालयाच्या स्तरावर पुर्ण करण्यात यावी. केलेल्या कार्यवाहीची एक प्रत पात्रता विभागास व एक प्रत परीक्षा विभागातील संबंधीत विद्याशाखांमध्ये पाठवून पोच घेण्यात यावी, त्यामुळे अशा विद्यार्थ्यांचे निकाल घोषित करतांना अडचणी येणार नाही अथवा राखीव राहणार नाही. तसेच इतर विद्यापीठातून प्रथम वर्ष उत्तीर्ण होवून, उमविमध्ये थेट द्वितीय वर्षास प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यासाठी आधी महाविद्यालयाने प्रवेश पात्रता विभागाची मान्यता घेणे आवश्यक आहे.

१२) प्रवेशीत विद्यार्थ्यांची शैक्षणिक पात्रता, प्रवेश घेतलेल्या शैक्षणिक वर्षातच पुर्ण करणे बंधनकारक आहे. जर काही विद्यार्थ्यांची त्यांच्या अभ्यासक्रम कालावधीत शैक्षणिक पात्रता झाली नाही, तर अश्या विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द करण्याची कार्यवाही संबंधीत महाविद्यालयाने त्यांच्या स्तरावर करावी व तसा अहवाल विद्यापीठास सादर करावा. तसेच ज्या त्या अभ्यासक्रमांचा कालावधी पुर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांच्या कागदपत्रांमध्ये अपुर्णता असल्यास अश्या विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द समजण्यात येईल व सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयाची राहील. कृपया वरील बाबींची नोंद घेवून विद्यापीठास सहकार्य करावे ही विनंती.

कळावे .

जा.क्र.उमवि/६/प्र.पा./६९ /२०१७
दिनांक ०४ जूलै,२०१७

आपला विश्वासू,

(स्वाक्षरी) ०४/०७/२०१७

विशेष कार्य अधिकारी
प्रवेश /पात्रता विभाग

**सोबत वरील प्रमाणे :-** परिशिष्ठ 'अ' व 'ब' हमीपत्र व प्रमाणपत्र

प्रति,

१) उमविशी संलग्नित महाविद्यालयांचे
मा.प्राचार्य / मान्यता प्राप्त परिसंस्थांचे संचालक

२) विद्यापीठाचे सर्व शैक्षणिक प्रशाळांचे मा.संचालक / विभागांचे प्रमुख

**प्रत माहितीसाठी :-** १) मा.संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,परीक्षा विभाग,उमवि.,जळगांव
२) मा.उपकुलसचिव, परीक्षा विभाग,( सर्व विद्याशाखा) उमवि.,जळगांव
३) मा.पध्दती विश्लेषक तथा नोडल ऑफिसर एमकेसीएल,उमवि.,जळगांव
४) समन्वयक, ई-सुविधा केंद्र,उमवि.,जळगांव

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

'A'GRADE
( NAAC RE-ACCREDITED) 3 rd Cycle

# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगांव-४२५००१

परिशिष्ट (अ)

## शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांचा पात्रता व ई-सुविधा शुल्काचा गोषवारा.

महाविद्यालयाचे नांव :- ------------------------------------------------------------------------------------

महाविद्यालयाचा सांकेतांक :- -------------------------- विद्याशाखा :- --------------------------------------

(प्रत्येक विद्याशाखेचा स्वतंत्र गोषवारा द्यावा)

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नांव | मंजूर प्रवेश क्षमता | विद्यार्थी संख्या | विद्यापीठ अंतर्गत | विद्यापीठ बाहेरील | ई-सुविधा शुल्क | पात्रता शुल्क | विलंब शुल्क | एकूण शुल्क |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | | | | |
| २ | | | | | | | | | |
| ३ | | | | | | | | | |
| एकूण | | | | | | | | | |

१) महाविद्यालयीन स्तरावर प्रवेश व पात्रतेचे काम पाहणाऱ्या कर्मचाऱ्याचे नांव :- ----------------------------------
व त्यांचा संपर्कासाठी मोबाईल नंबर :---------------------------------------------------------------------------

२) यापुर्वी पात्रता व ई-सुविधा शुल्क जमा केले असल्यास रिसिट नंबर :---------------- पात्रता शुल्क रु. ---------/-
ई-सुविधा शुल्क रु. --------------/- दिनांक :- ------------- रोजी जमा केलेले आहे. (छायांकित प्रत जोडावी)
ई-सुविधा शुल्क रु. -------------/- ची नोंद घेतली. ई-सुविधा केंद्रातील संबंधीताचे नांव :---------------------

३) पदवी करिता इतर राज्यातील तसेच पदविका व पदव्युत्तर वर्गासाठी विषय निहाय पात्रता अर्ज,मुळ मायग्रेशन, गॅप सर्टिफीकेट व टी.सी.ची छायांकित प्रत,गुणपत्रक इत्यादी सादर करणे आवश्यक आहे.

**सोबत :-**१) मा.प्राचार्यांचे मान्यता पत्राची छायांकित प्रत.
२) संलग्नता विभागाचे विद्यार्थी संख्या मंजुरी पत्राची प्रत.
३) विद्यार्थ्यांचे प्रवेश नियमानुसार झाल्याचे मा.प्राचार्यांचे प्रमाणपत्र.
४) विद्यार्थ्यांचे हमीपत्र.
५) माईनडेड.
६) विद्यापीठ शुल्काचा शेअर चार्ट.
७) प्रवेश रद्द केलेले असल्यास प्रवेश रद्दचे पत्र.
८) परिशिष्ठ- ब - विद्यार्थ्यांनी जोडलेल्या कागदपत्राच्या पडताळणीसाठी एकत्रित तक्ता.
९) महाविद्यालयाने नियुक्त केलेल्या प्रवेश नियंत्रण समिती सदस्यांची नावे व मोबाईल नंबर इ.माहिती .

प्राचार्य
( सही व शिक्का )

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१७-१८ साठी आमच्या महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांच्या मुळ गुणपत्रकांची तपासणी करण्यात आली आहे. तसेच शाळा/ महाविद्यालय सोडल्याचा मुळ दाखल्याची महाविद्यालयाकडून खात्री करण्यात आली असून यादीतील सर्व विद्यार्थी युजीसीने मान्यता दिलेल्या विद्यापीठांतील / शासन मान्य बोर्डातील तसेच सर्व विद्यार्थी विद्यापीठ पात्रता नियमानुसार प्रवेशास पात्र आहेत, प्रवेशित विद्यार्थ्यापैकी कुणालाही अपुर्ण कागदपत्रांवर प्रवेश दिलेला नाही. तसेच सर्व प्रवेश महाविद्यालयाने नेमलेल्या प्रवेश समिती मार्फत झालेले आहेत. यात काही तफावत आढळल्यास याची सर्वस्वी जबाबदारी प्राचार्य म्हणून माझी राहील.

स्थळ :-

दिनांक :-

मा.प्राचार्य,

स्वाक्षरी व महाविद्यालयाचा शिक्का

महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग,परिपत्रक क्रमाक एसटीसी-१००६/प्र.क्र.१०२/का.१० दिनांक ३० ऑगस्ट,२००६ अन्वये व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी महाविद्यालयात अनुसूचित जमातीच्या राखीव जागेवर प्रवेश घेतांना संबंधीत विद्यार्थ्यांकडून हमीपत्र (Undertaking) रु.५०/-एवढया रकमेच्या स्टॅप पेपरवर खालील प्रमाणे पात्रता अर्जासोबत सादर करावे.

## हमीपत्र (Undertaking)

मी श्री./श्रीमती ------------------------------------------------ हमीपत्र लिहून देतो/देते की, शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करीता----------------------------------------- या महाविद्यालयात ------------------- अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला आहे. मी घोषित करतो/करते की, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीकडून माझा अनुसूचित जमातीच्या यादीतील जमातीचा दावा अवैध ठरला तर अभ्यासक्रमाचा निकाल (Result) मिळण्यास तसेच अनुसूचित जमाती बाबतचे कोणतेही फायदे घेण्यास मी पात्र राहाणार नाही. महाराष्ट्र अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० (सन २००१चा क्र.२३) च्या कलम १०,११ व १२ मधील तरतूदीनूसार मी शिक्षेस पात्र राहीन.

स्थळ :-    विद्यार्थ्याचे पुर्ण नांव,सही व पत्ता

दिनांक :-

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव

## परिशिष्ठ - (ब)

वर्ग :- --------------------------- विषय :- ------------------------------------ या अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांनी पात्रता अर्जासोबत जोडलेल्या मुळ व सत्यप्रती इ.कागदपत्राच्या पडताळणीसाठी एकत्रित तक्ता

महाविद्यालयाचा सांकेतांक :- ---------------------------- महाविद्यालयाचे नांव:- ---------------------------------------------------------------------------------------------------- विद्याशाखा :- -----------------------------------

अभ्यासक्रम :- मंजूर प्रवेश क्षमता :- प्रत्यक्ष प्रवेशित संख्या :-

| अ.क्र. | विद्यार्थ्याचे नांव | संवर्ग | विद्यापीठाचे नांव | डी.टी.ई/पी.एन.एस प्रवेश पत्र | सी.ई.टी. गुणपत्रक | एल.सी/टी.सी | 12वी / पदवी / पदव्युतर गुणपत्रक | शेवटच्या वर्षाची टक्केवारी / ग्रेड | जातीचे प्रमाणपत्र | जात वैधता प्रमाणपत्र | नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र | अधिवास दाखला | राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र | गॅप सर्टिफिकेट | स्थलांतर प्रमाणपत्र | शेरा (शेरा व पात्रतेचा तक्ता उमवि कार्यालयीन उपयोगासाठी) | पात्रता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Casts | NMU/O.U/O.S | Alloutment | Scorcard | L.C/T.C | M/S | Percentage | Casts | CVC | NCL | DOM | NC | Gap | Mig. | | Eligibility |
| | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | |

प्रमाणित करण्यात येते की, सदर प्रवेश मान्यता प्राप्त प्रवेश संख्येतच करण्यात आलेले असून,विद्यापीठाने प्रसिध्द केलेल्या परिपत्रक व मार्गदर्शक तत्वानुसार नियमाप्रमाणे आहेत.वरील तक्त्यातील माहितीची पडताळणी करण्यात आलेली असून,सदर माहिती अचुक व बरोबर आहे.

महाविद्यालयीन कर्मचाऱ्याचे नांव :-
मोबाईल नंबर :-

मा.प्राचार्य (सही व शिक्का)
महाविद्यालयाचा फोन नंबर :-